'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I – Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
April-May-June - 2016

# ब्रिटीश प्रशासनावर चांदवड तालुक्यातील १९४२ च्या चले जाव आंदोलनाचा प्रभाव

**प्रा. विलास मारूती पवार**
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
सायखेडा

**प्रास्तविक :**

इ.स. १६०० शतकात भारतात व्यापार करण्यासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने व्यापारवृध्दी करण्यासाठी भारतातील राजकीय अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन इ.स. १७५७ प्लासीच्या लढाईने भारतात सत्तेचा पाया घातला. स्थानिक सत्तांचे दुबळेपण हे इंग्रजांच्या विजयाचे एक महत्त्वाचे कारण ठरले. राजकीय क्षेत्रात घडून आलेल्या या परिवर्तनाचे परिणाम समाज जीवनाच्या सर्वच अंगावर होणे अपरिहार्य होते. कारण नव्या राज्यकर्त्यांनी आपल्याला अनुरूप असे बदल घडवून आणण्यास सुरूवात केली. ब्रिटीशांचे शासन स्थिर झाल्यानंतर त्यांनी अनेक जाचक निर्बंध भारतीयांवर लादले. त्यामुळे भारतीयांमध्ये असंतोष माजू लागला. अशा परिस्थितीत पुढे इ. स. १७५७ मध्ये भारतीय जनतेने कंपनीच्या राजवटीविरूध्द देशात मोठा उठाव केला. इंग्रजी सत्तेच्या कारभाराविषयी येथील जनतेच्या मनात निर्माण झालेल्या असंतोषाचा तो उद्रेक होता. पण ब्रिटिशांनी हा उठाव सैनिक बळावर दडपून टाकला. परंतु याचा परिणाम म्हणजे कंपनीचे राज्य संपुष्ठात येऊन भारताचा कारभार ब्रिटीश सरकारकडे आला. ब्रिटीशांनी या काळात संस्थानिकांशी गुप्त तह करून फोडा व राज्य करा या नितिचा अवलंब करून आपले राज्य हिंदुस्थानात स्थिर केले.

ब्रिटीश सरकारच्या विरोधात महात्मा गांधीजी, पंडित नेहरू यांसारख्या राष्ट्रीय कार्यकर्त्यांनी ब्रिटीशांना हिंदुस्थानातून घालवून लावण्यासाठी जो अंतिम लढा सुरू केला होता त्यात भारतातील प्रत्येक खेड्यापाड्यातून प्रतिसाद मिळू लागला होता. त्यामुळे या लढ्याला यश मिळण्यासाठी चांदवड शहरात चळवळीचा अवलंब केला.

**चले जाव आंदोलनात नेमिनाथ हायस्कुलमधील विद्यार्थ्यांचा सहभाग :**

८ ऑगस्ट, १९४२ ची रात्र, स्वातंत्र्य आंदोलनाची भाग्यशाली रात्र या रात्री राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी इंग्रजांना चले जाव चा आदेश देऊन आंदोलनाचा शंख फुंकला होता. भारतभर हालचाली सुरू झाल्या होत्या. इंग्रजांची दमन - नीती जोरात होती. मोठ्या नेत्यांना पकडून जेलमध्ये टाकले जात होते. क्रांतिकारी विचारांचे असंख्य युवक भमिगत झाले होते. सरकार त्यांना पकडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. सरकारच्या धरपकड, लाठीमार, गोळीबाराचे प्रत्युत्तर, क्रांतीकारकांद्वारे रेल्वेचे रूळ उखडणे, सरकारी खजिना लुटणे, सरकारी इमारतीत बॉम्ब ठेवून त्यांना उखडून टाकणे, तारांचे खांब उखडणे इ. विध्वंसक कार्य जोरात चालू होते.

सत्याग्रहींच्या बातम्या रोज ऐकण्यात - वाचण्यात येत होत्या. भूमिगत क्रांतिकारकांच्या कथा विद्यार्थ्यांच्या कानावर येत होत्या. परिणामतः नेमिनाथ आश्रमाच्या मोठ्या विद्यार्थ्यांचे डोके तापले होते. त्यांच्या मनात इंग्रजांविरूद्ध तिव्र तिरस्काराची भावना निर्माण झाली होती. भाई जगनलाल पारेखच्या नेतृत्वाखाली ८ - १० विद्यार्थी काकाजींच्या समोर धर्मसंकट उभे राहिले होते. विद्यार्थ्यांची देशभक्तीची तीव्र भावना पाहुन त्यांना आंतरिक समाधान झाले. परंतु विद्यार्थ्यांनी आंदोलनात

सक्रिय भाग घेणे त्यांना पसंत नव्हते. ते म्हणत होते की विद्यार्थ्यांनी आंदोलनात सक्रिय भाग घेणे त्यांना पसंत नव्हते. ते म्हणजे होते की विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, सर्वांगिण विकास करावा. काकाजींनी त्यांना वेगवेगळे उदाहरणे देऊन समजावले. सत्याग्रह करून आश्रमाच्या समोर किती समस्या पैदा होतील, आश्रम सरकारच्या दमन नीतीच्या प्रभावाखाली कसा येईल इ. विचार समजावून विद्यार्थ्यांना शांत केले.

विद्यार्थ्यांनी सत्याग्रहाची जिद्द तर सोडली, परंतु ते शांत बसले नाही. दहशतवादी जहाल सरकारच्या विरूध्द काही ना काही तरी करण्यासाठी त्यांचे मन उताविळ झाले होते. रात्रीच्या अंधारातुन जंगलातून विद्यार्थी दूर चालून येत असत व टेलिफोनचे खांब उखडून फेकत, तारा तोडून टाकत, सरकार विरूध्द पत्रक छापून भिंतीवर चिकटवून येत, एका रात्री तर काही विद्यार्थ्यांनी पोलिस चौकीमध्ये ॲसिड बॉम्ब ठेवला होता. परंतु पोलीस चौकीचे काही जास्त नुकसान झाले नाही. परंतु या घटनेने पुर्ण आश्रमाला हैराणी झाली होती. ज्या कपड्यामध्ये ॲसिड बॉम्ब गुंडाळून पोलीस चौकीत ठेवला होता. तो एका बनियनामध्ये होता. त्याचा अर्धा भाग पोलीसांच्या हाताला लागला. दुर्भाग्य असे की त्या तुकड्यावर धोबीच्या पक्क्या शाईने के.बी. नाव लिहिलेले होते. पोलिस के.बी. ची चौकशी करण्यासाठी आश्रमात घुसले. ते अत्यंत कठोर होते. चारही बाजुंनी दहशत फैलावली. प्रत्येक विद्यार्थ्यांची चौकशी केली. त्यांच्या पेट्या, बिछाना खोलुन पाहिला, कपडे पुस्तके उलट - पालट करून पाहिले. परंतु हस्तगत करणाऱ्या पोलिसांच्या हातात काहीच मिळाले नाही. आश्रमात त्या दिवशी तीन - चार के. बी. होते. सुदैवाने त्यापैकी दोन अनुपस्थित होते व जे उपस्थित होते ते पोलिसांची बातमी मिळताच आश्रमातून गायब झाले व पोलिस निघुन गेल्यानंतर परत येऊन टपकले. पोलीस बिचारे हात हालवत परत गेले.

हायस्कुलचे मुख्याध्यापक श्री. वीरकरजीचे आद्याक्षरही के. बी. होते. त्यांच्याही घरी जाऊन पोलिसांनी चौकशी केली. सुदैव हे की श्री. वीरकरजी जे बनियन घालत होते त्याचा कपडा काही अलग धाग्याचा होता व त्याच्यावर धोब्याच्या शाईने नावही लिहिलेले नव्हते. तेथेही पोलिसांना काही मिळाले नाही, परंतु वीरकरजींना हैराण व्हावे लागले.

या दिवसात काकाजी खुप तणावात होते. राजकीय क्षेत्र अत्यंत स्फोटक, सरकारी दमनाची दहशत, दुसऱ्या महायुध्दाचे कारण, महागाईची भीषणता, विद्यार्थ्यांची क्रांतीकारी विचार या सर्वांमुहे त्यांचे मन खुप तणावात होते. या तणावपुर्ण हालाकीत काकाजींनी मानसिक संतुलन सांभाळले आणि परिस्थितीला सांभाळले व काही काळ ते आरामात राहु लागले. विद्यार्थ्यांना आपले विद्यार्थी धर्म व कर्तव्याची शिकवण देऊन शांत करीत. विद्यार्थ्यांनीही सुध्दा अनुभव घेतला की आपल्यामुळे आश्रम संकटात आला. तेव्हा त्यांनी शांत रहाणे पसंत केले.

**तारा तोडणे :**

ब्रिटीशांमध्ये असलेले सामर्थ्य हे संदेश वहनात आहे याची जाणीव चांदवड शहरातील लोकांना होऊ लागली. त्यामुळे ब्रिटीश अधिकारी जलद गतीने हालचाली करतात. तेव्हा ही संदेश यंत्रणाच तोडली पाहिजे असे लोकांना वाटू लागले. यात श्री. लखीचंद्र रामचंद्र आबड आघाडीवर होते. त्याबद्दल त्यांना १ वर्षाचा कारावास झाला होता.

**महालकऱ्यांचा टांगा जाळला :**

चांदवड शहरात चंद्रात्रे नावाचा महालकरी होता. त्यांचा टांगा ऐन दिवाळीच्या सणाच्या दिवशी पहाटे जाळण्यात आला. त्यात शहरातील श्री. दत्तात्रय विनायक वावीकर व श्री दिनकर गोपाळ घमंडी आघाडीवर होते. त्याबद्दल त्यांना अटक करून सोडून देण्यात आले.

**मिलटरी धान्याचा साठा लुटला :**

१९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले. त्यामुळे धान्य मिलटरीकडे मोठ्या प्रमाणात पाठविले जात होते. चांदवड तालुक्यात अन्नधान्य टंचाई निर्माण झाली. त्यात दुष्काळ पडला. नांदगांव येथे ब्रिटीश धान्याचा डेपो होता. या डेपोत धान्य पडून होते. लोकांना खायला अन्न नाही आणि सरकारने धान्य पडून होते. लोकांना खयला अन्न नाही आणि सरकारने धान्य साठवून ठेवले त्यातून तीव्र प्रतिक्रिया उमटली व धान्य साठी लुटला व धान्य विक्री केली. यात चांदवड शहरातील श्री. मुरलीधर भाऊ शेट यांचा सहभाग होता. त्याबद्दल त्यांना १ वर्ष सक्षम कारावासही झाला.

**मोटार स्टँडवर हातबॉंब स्फोट :**

ब्रिटीशांमध्ये दहशत निर्माण व्हावी म्हणून चांदवड शहरात मोटार स्टँडवर हातबॉंब स्फोट करण्यात आले होते. त्यात चांदवड शहरातील श्री. लखीचंद रामचंद्र आबड व श्री. रमणलाल खेमचंद कापडीया आघाडीवर होते.

**टेलिफोनचे पोल उध्वस्त :**

८ ऑगस्ट १९४३ रोजी चांदवड - लासलगांव या महामार्गावर टेलीफोनचे १४ पोल उध्वस्त करण्यात आले व त्यांच्या वायर तोडण्यात आल्या. त्यामुळे ब्रिटीशांची संदेश यंत्रणा विस्कळीत झाली होती.

**पोस्टपेटी प्रकरण :**

ब्रिटीशांचे असलेले सामर्थ्य संदेश वाहनात असल्याने, त्यांची महत्त्वाची कागदपत्रे गहाळ करणे व त्यांना जेरीस आणणे यासाठी पोस्टाच्या पेट्या पाठविल्या जात असत व पोस्टमनला लुटले जात असे. त्यात चांदवड शहरातील श्री. गंगाधर रामचंद्र बोऱ्हाडे व श्री. दत्तात्रय विनायक वावीकर हे काम करीत होते.

**चले जाव आंदोलनातील चांदवड शहरातील स्वातंत्र्य सैनिक :**

१. श्री. कासलीवाल दिपचंद शिवलाल : १९४२ च्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून भाग घेतला. चळवळ सतत चालू ठेवण्याचे काम त्यांनी केले. कार्यकर्त्यांना मदत करणे, गुप्त बातम्या पोहचविणे, तुरुंगात असलेल्या लोकांच्या घरच्या माणसांची व्यवस्था पाहणे व त्यांना आर्थिक सहाय्य पुरविणे अशी कामे त्यांनी केली.

२. श्री. बोऱ्हाडे विष्णु रामचंद्र : १९४२ साली चांदवड शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. तेथे त्यांना मारहाण करण्यात आली होती. हे भूमिगत कार्यकर्ते होते.

३. श्री. खत्री मोतीसा कन्हैयासा : १९४२ च्या चलेजाव चळवळीत सभा मिरवणूकीत भाग घेऊन लोकजागृतीचे कार्य केले त्याबद्दल त्यांना सात महिने स्थानबध्द केले.

४. श्री. क्षत्रिय मोतीसा नानासा : १९४२ च्या चलेजाव आंदोलनात सहभाग घेतला. तारा तोडल्याबद्दल त्यांना ३ महिने नाशिकरोड कारागृहात स्थानबध्द केले.

५. श्री. घमंडी दिनकर गोपाळ : १९४२ च्या आंदोलनात पोस्टाची पेटी चोरणे, बुलेटिन वाटणे, तारा तोडणे इ. कामे केली. मामलेदारांचा टांगा जाळला त्याबद्दल अटक करून सोडून देण्यात आले.

६. श्री. तेली मुरलीधर भाऊशेट : चले जाव चळवळीत भाग घेतल्यामुळे अटक करण्यात आली होती व ४ महिने अंडर ट्रायल कैदिपुढे १ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली.

७. श्री. पिंगटे सोनू दामोदर : यांनी १९४२ च्या आंदोलनात भाग घेतला होता. बुलेटिन प्रसिध्द करणे, पोस्टाचे खांब व तारा तोडणे, मामलेदाराचा टांगा जाळण्यात अग्रेसर होते.

**समालोचन :**

१९४२ च्या चलेजाव आंदोलनाचे पडसाद संपुर्ण भारतभर प्रखरतेने उमटले आणि समकालिन लहान थोरांपासुन ते वृध्दांपर्यंन्त सर्वच देशभक्तांचे रक्त उसळून सरसळू लागले. या घटणेच्या परिणामातून चांदवड तालुकाही पेटून उठला.

त्याची खरी सुरूवात झाली नेमिनाथ हायस्कुल मधील विद्यार्थी युवकांमध्ये ह्या ठीणगीचे मोठ्या ज्वालेत रूपातरण व्हायला जराही अवधी लागला नाही आणि वणव्याप्रमाणे इंग्रज सरकारच्या विरोधात प्राण मुठीत होवून अनेक विध्वंसक क्रांतीकारक पराक्रमी कार्यवाही होण्यास सुरूवात झाली. म्हणजेच महात्मा गांधीच्या एका आदेशाने ग्रामीण भाग किती प्रभावी होवू शकतो हे चांदवड तालुक्यातील आंदोलनातून सर्वसामान्य देशभक्तांनी सिद्ध करून दाखविले.

**संदर्भ :**

१. डॉ. देसाई संजीव, कॅलेंडर ऑफ क्वीट इंडिया मुव्हमेंट इन द बॉम्बे प्रेसिडेन्सी, प्रस्तावना क्रं. ६.
२. संघर्षरथी, पृष्ठ क्र. ४६
३. स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, १९७९, महाराष्ट्र राज्य पश्चिम महाराष्ट्र खंड १.
४. मुजुमदार आर. सी. स्ट्रगल ऑफ फ्रिडम, पृष्ठ क्र. ६४७
५. केळकर श्रीपाद, छोडो भारत, १९४२, पृष्ठ क्र. १८ व १९.